विषय क्र. ४२

# बृहन्मुंबई महानगरपालिका

क्र. दि. 29 .06.2019

**प्रेषक** : महानगरपालिका आयुक्त

**प्रति** : महानगरपालिका चिटणीस

**विषयः रस्तारुंदीकरणात बाधित होत असलेल्या निवासी/ अनिवासी बांधकामांची पात्रता ठरविण्याबाबतचे धोरण**

**संदर्भः 1) क्र. अति.आयु./पू.उप./डी/168 (प्र.अ 1876/डीपीसी/जन) दि. 25.02.2004**

**२) क्र. प्रअ/वि.नि./19922/पू.उप. दि. 20.03.2017**

**खाते : रस्ते व वाहतूक/विभाग कार्यालय.**

''बृहन्मुंबई महानगरपालिकेने रस्ता रुंदीकरणात बाधित निवासी/ अनिवासी बांधकामांची पात्रता निश्चित करण्याकरीता सद्यपरिस्थितीत संदर्भ क्र. 1 व 2 अन्वये Bottleneck Policy तयार करण्यात आली होती. सदर धोरणानुसार शासकीय किंवा महानगरपालिकेच्या जागेवरील रस्ता रुंदीकरणात येणारी निवासी/अनिवासी बांधकामांची पात्रता ठरविताना महाराष्ट्र शासनाच्या झोपडपट्टी पुनर्विकास धोरणानुसार सरसकट दि. 01.01.2000 ही लागु करण्यात येत होती. तथापि खाजगी जागांवरील बाधित बांधकामांना महाराष्ट्र राज्य शासनाच्या झोपडपट्टी पुर्नविकास धोरणाचा फायदा देण्यात येत नाही. त्यामुळे लोकांमध्ये अन्यायाची भावना निर्माण होत असून बाधित बांधकामधारक विविध मार्गानी रस्ता रुंदीकरणामध्ये अडथळे आणले जात असून रुंदीकरणाची कामे बरीच वर्षे रखडलेली आहेत त्यामुळे सदर धोरणात बदल करणे आवश्यक आहे.

२. महाराष्ट्र शासनाने मुंबई नागरीक परिवहन प्रकल्पांतर्गत MMRDA मार्फत राबविण्यात आलेल्या एम.यु.टी.पी./ एम.यु.आय.पी. प्रकल्पामध्ये अवलंबलेले धोरण बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत राबविण्यात येणा-या रस्ते रुंदीकरण व विकासासाठी अर्हता दिनांक 01.01.2000 लागू करणे आवश्यक आहे.

३. बृहन्मुंबई महानगरपालिकेतील रस्ते रुंदीकरणाचे काम बरीच वर्ष रखडलेली असून सदरहु धोरणांचा अवलंब केल्यास रस्ते रुंदीकरण व विकासाची काम त्वरित पूर्ण करणे शक्य होईल. सदरबाबत बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील रस्ते रुंदीकरणाची कामे करण्यासाठी रस्ता रुंदीकरणात बाधित होणा-या बांधकामाची पात्रता निश्चित करण्यासाठी अर्हता दिनांकाबाबत खालील प्रमाणे बदल करणे आवश्यक आहे जेणेकरुन रस्ते रुंदीकरणाची कामे करणे सुलभ होईल.

४. सध्याच्या प्रचलित धोरणानुसार घोषित झोपडपट्टीचे क्षेत्र वगळून उर्वरित क्षेत्रातील प्रकल्प बाधित बांधकामांची पात्रता निश्चित करण्याची अर्हता दिनांक, अनिवासी बांधकामांसाठी दि.01.04.1962 व निवासी बांधकामांसाठी दि.17.04.1964 आहे. सदर पात्रता निकषात बदल करुन आताच्या नवीन धोरणानुसार निवासी व अनिवासी सर्व क्षेत्रातील प्रकल्प बाधित बांधकामांसाठी सरसकट 01.01.2000 करण्यात येत आहे. सदरची तरतूद फक्त महापालिकेचे विकास नियोजन आराखडयानुसार राबवायच्या महत्वाच्या प्रकल्पासाठी व रस्ता रुंदीकरणासाठी लागू करण्यात येत आहे.

५. उपरोक्त बांधकाम पात्रता निकषास माननीय गटनेत्यांच्या मंजूरीस सविनय सादर.''

| | | | |
|---|---|---|---|
| उप आयुक्त | उप आयुक्त | अतिरिक्त आयुक्त | म.न.पा. आयुक्त |
| (परिमंडळ-6) | (अतिक्रमण निर्मुलन) | (पूर्व उपनगरे) | |